शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## आरोग्यसेवेत नियमभंग; कारवाईची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात आरोग्यसेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नियमभंग होत असल्याचे समोर येत आहे. बॉम्बे नर्सिंग क्ट, आयएचआयपी (Integrated Health Information Platform), डब्ल्यूएचएमआयएस (Web Health Management Information System) यांसारख्या प्रणालींचे काटेकोर पालन बंधनकारक असतानाही अनेक डॉक्टर, रुग्णालये आणि क्लिनिक नियमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहेत.

वैद्यकीय अधिक्षक श्री दुर्गावाड यांनी दिलेल्या माहितीनुसार परतूर शहरातील शेकडो डॉक्टरांपैकी केवळ १६ डॉक्टरांनीच नोंदणी पूर्ण केली आहे, तर इतर डॉक्टर नियमभंग करून रुग्णसेवा चालवत आहेत. ही बाब केवळ परतूरपुरती मर्यादित नसून संपूर्ण जिल्ह्याभरात अशा शेकडो क्लिनिक आणि नर्सिंग होम्स नियमबाह्य पद्धतीने सुरू असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**नियमांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष**

सरकारी धोरणांनुसार, प्रत्येक रुग्णालय, दवाखाना किंवा क्लिनिक यांची नोंद संबंधित आरोग्य व्यवस्थापन प्रणालींमध्ये करणे अनिवार्य आहे. नियमभंग करणाऱ्या डॉक्टरांचे वैद्यकीय नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याची आणि त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद कायद्यात आहे. तरीही आरोग्य विभागाकडून याकडे दुर्लक्ष केल्याने डॉक्टर नियम मोडत आहेत.

**रुग्णांच्या सुरक्षिततेवर गदा**

नोंदणी नसलेल्या रुग्णालयांमध्ये वैद्यकीय सेवा मिळवणाऱ्या रुग्णांचा जीव अक्षरशः धोक्यात टाकला जात आहे. कारण अशा ठिकाणी ना सरकारी तपासणी होते, ना उपचार पद्धतींवर नियंत्रण ठेवले जाते. ग्रामीण भागात तर बोगस डॉक्टरांचा प्रभाव वाढत असून, योग्य वैद्यकीय उपचार न मिळाल्याने गंभीर गुंतागुंत किंवा मृत्यूच्या घटना वाढत आहेत.




**मनमानी आणि दिशाभूल**

अनेक डॉक्टर आपल्या मूळ शैक्षणिक पात्रतेनुसार प्रॅक्टिस न करता वेगळ्या शाखेत उपचार करत आहेत. उदाहरणार्थ, आयुर्वेद किंवा होमिओपॅथी शिकलेले डॉक्टर थेट ॲलोपॅथी उपचार करताना दिसतात. त्याशिवाय क्लिनिकच्या बाहेर योग्य माहितीफलक न लावणे, डिग्री किंवा पात्रतेची संपूर्ण माहिती न देणे यामुळे रुग्णांची दिशाभूल केली जाते.

या परिस्थितीबाबत रुग्ण आणि नागरिकांमध्ये संताप आहे. सरकारने पारदर्शकतेसाठी कायदे केले, पण त्यांची अंमलबजावणीच होत नाही. अधिकारी गप्प बसल्यामुळे नियमभंग करणाऱ्या डॉक्टरांचे धाडस वाढले आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

या गंभीर परिस्थितीत सर्व डॉक्टर, रुग्णालये आणि क्लिनिक यांची नोंदणी तपासणी मोहीम सुरू करणे. नियमभंग करणाऱ्या डॉक्टरांवर फौजदारी गुन्हे नोंदवणे. ग्रामीण भागातील बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करणे. प्रत्येक क्लिनिक आणि नर्सिंग होममध्ये पारदर्शक माहितीफलक अनिवार्य करणे. नागरिकांना जागरूक करून योग्य वैद्यकीय सेवा निवडण्यासाठी माहिती मोहिमा राबवणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

आरोग्य हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. मात्र, योग्य तपासणी आणि नियंत्रण यंत्रणा शिथिल झाल्यामुळे आरोग्यसेवा व्यापारीकरणाच्या जाळ्यात अडकत आहे. कायद्याचे अस्तित्व फक्त कागदावर मर्यादित राहिले आहे. जर शासनाने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर ग्रामीण आणि शहरी भागात आरोग्य व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास पूर्णपणे ढासळेल. या संदर्भाने जिल्हा वैद्यकिय अधिकारी यांची भुमिका महत्त्वाची असून त्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

### जालना शहरात गौरी आगमनाची लगबग
## मखर, मुखवटे व पूजन साहित्य खरेदीसाठी महिलांची मोठी गर्दी



**गौरी आगमनाची लगबग ...**
रंगीबेरंगी मखर, मुखवटे आणि पूजन साहित्याने सजलेले स्टॉल्स. बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी करणाऱ्या महिलांचा उत्साह. (छाया - किरण खानापुरे)

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात गौरी पूजनाच्या आगमनानिमित्त बाजारपेठांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. पारंपरिक पद्धतीने गौरी पूजन करण्यासाठी आवश्यक साहित्य खरेदीसाठी महिलांची मोठी गर्दी विविध बाजारपेठांमध्ये उसळली आहे. शहरातील सराफा गल्ली, मंठा चौफुली, शंकर नगर परिसर, तसेच मुख्य बाजारपेठांमध्ये सकाळपासूनच खरेदीसाठी महिलांची गर्दी होत आहे.

पारंपरिक मखर, सजावटीचे वस्त्र, रंगीबेरंगी फुले, मुखवटे, कुंकू-हळद, अगरबत्ती, पूजन साहित्य, तसेच चांदीच्या आणि मातीच्या गौरी मूर्तींची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. यंदा बाजारात आधुनिक डिझाईनची मखरे, रंगीबेरंगी मुखवटे, तसेच पर्यावरणपूरक मूर्तींची विशेष मागणी आहे. प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) ऐवजी शाडू मातीच्या गौरी मूर्तींना अधिक पसंती मिळत आहे.

व्यापाऱ्यांनी सांगितले की, यावर्षी महागाईचा थोडासा परिणाम असला तरी खरेदीत घट नाही. महिलांचा उत्साह ओसंडून वाहत असून पारंपरिक खरेदीसोबत सजावटीच्या वस्तूंच्या खरेदीकडेही कल वाढला आहे. विशेष म्हणजे, सोशल मीडियावर दाखविलेल्या आधुनिक डेकोरेशनच्या ट्रेंडचा प्रभाव यंदा मोठ्या प्रमाणावर दिसत आहे.

गौरी पूजन हे महाराष्ट्रातील महिलांसाठी पारंपरिक सण असून, सध्या खरेदीचा हंगाम जोरात सुरू आहे. महिलांनी पारंपरिक परंपरेनुसार पूजा करण्यासाठी विशेष तयारी केली आहे. विविध महिलांचे गट एकत्रित खरेदी करताना बाजारपेठेत उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत वाहतुकीची कोंडीही जाणवली, तरीही पोलिस आणि नगरपालिकेने गर्दी नियंत्रणासाठी विशेष व्यवस्था केल्याने खरेदी सुरळीतपणे सुरू आहे. विक्रेत्यांच्या मते, पुढील दोन दिवसांत खरेदीचा शिखर गाठला जाण्याची शक्यता आहे.

बाजारात पर्यावरणपूरक गौरी मूर्तींना जास्त मागणी., आधुनिक डेकोरेशन साहित्याच्या खरेदीत वाढ होत आहे. बाजारपेठेत वाहतुकीसाठी पोलिसांकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात येत असला तरी तो तोकडा ठरत आहे.

## युवा आदर्श
### ऑनलाईन रमी...

सेलिब्रिटी जाहिरात
जिंकण्यां देती हमी
उद्युक्त करी सकला
खेळे ऑनलाईन रमी
ते स्वता मालामाल
प्रसन्न वैभव लक्ष्मी
खेळणारे फसू जाय
पदरी पडे अवलक्ष्मी
नवीन रुपात जुगार
खोलवर पोखरे कृमी
निमुट सहन करायचे
स्वताचं कृत्ये जुलमी
लुटा सर्वां बिनधास्त
सिस्टिम होई निकामी
राजरोस दरोडा पाडा
बुध्दीची होई निलामी
नवीन तंत्रज्ञान उलटे
भले भले करे गुलामी
हव्यासाच्या विळख्या
अधोगती देई सलामी
नव्यां सोबत जुनी पिढी
गोंधळात पडते संभ्रमी
जोमात बोकाळी धंदा
रे आवेग केवढे उग्रमी
झटपट मिळो श्रीमंती
शार्टकट बने ऐषारामी
गटारीत जावून मिसळे
घामाचा पैसा परिश्रमी
खिळखिळे होईसगळे
पध्दत झाली व्युत्क्रमी
कारवाई हवीतात्काळ
गजाडकरावे पराक्रमी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ उपक्रमातून संपूर्ण राज्यात नागरिकांची आरोग्य तपासणी
### मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा पुढाकार

**मुंबई -** गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.

या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे.

शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या **पान २ वर**

### भारतीय जनता पार्टी जालना ग्रामीण जिल्हा कार्यकारिणी जाहिर
## नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणूका जिंकण्यासाठी सज्ज रहावे - आ.नारायण कुचे

**जालना । प्रतिनिधी -** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री.अमित शहा, जे.पी.नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर,



आ.संतोष दानवे, माजी आ. कैलास गोरंटयाल, विलास खरात, सतिष घाडगे यांच्याशी विचार विनिमय करुन भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना ग्रामीण ची कार्यकारिणी २०२५-२०२८ भारतीय जनता पार्टीच्या घटनेप्रमाणे भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे यांनी घोषीत केली आहे.

यावेळी आ. नारायण कुचे म्हणाले की, भाजपाच्या नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका जिंकण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी संघटन मजबुत करुन सामान्य जनतेचे कामे करुन केंद्र व राज्याच्या जनकल्याणकारी योजना ग्रामीण भागातील जास्तीजास्त नागरीकांपर्यंत पोहचविण्याचे काम करावे असे आवाहन केले.

भारतीय जनता पार्टी जालना ग्रामीण जिल्हा कार्यकारिणी भाजपा जिल्हाध्यक्ष आ. कुचे यांनी भारतीय जनता पार्टीच्या घटनेप्रमाणे जाहिर केली असून त्यामध्ये जिल्हा उपाध्यक्ष १० , जिल्हा सरचिटणीस ५ , जिल्हा चिटणीस १० , कार्यालयप्रमुख १ , प्रसिध्दीप्रमुख १ , कोषाध्यक्ष १ व जिल्हा कार्यकारिणी सदस्य ६२ याप्रमाणे जाहिर केली आहे.

भाजपा जिल्हा **पान २ वर**

## शासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करावा - जिल्हाधिकारी मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** आजमितीस तंत्रज्ञानात नवनवीन बदल होत असून सद्यस्थितीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सर्वत्र केला जात आहे. तरी जालना जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी -कर्मचाऱ्यांनी शासकीय कामकाज करतेवेळी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ए.आय.) वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी प्रशिक्षणात केले.

जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवार दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी एम. के. सी. एल. मार्फत कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.) प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, **पान २ वर**

## जालना पोलीस दलाला मिळाले दोन नवे मिनी बस
### कायदा-सुव्यवस्थेच्या बळकटीसाठी महत्त्वाचे पाऊल

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आणि विविध पोलीस कामकाज अधिक कार्यक्षम करण्यासाठी जालना पोलीस दलाला दोन नव्या मिनी बसची ताकद प्राप्त झाली आहे. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आदेशावरून जालना जिल्हा पोलीस घटकास आयशर कंपनीच्या दोन २२ सिटर मिनी बस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

गुरुवार (दिनांक २८) रोजी नव्या मिनी बस जालन्यात दाखल झाल्या. त्यांचे लोकार्पण पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल आणि अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस उपअधीक्षक (गृह) आर.डी. निकाळजे, पोलीस निरीक्षक पंकज जाधव (स्थानिक गुन्हे शाखा), पोलीस निरीक्षक रविंद्र पेरगुलवार (जिल्हा विशेष शाखा), तसेच मोप पर्यवेक्षक आर.बी. चवरे, कार्यालय अधीक्षक पी.एम. कोर्ड, स्वीय सहाय्यक प्रल्हाद आईनवाड, जी.एस. डिगोळे, आय.एस. सय्यद, मनिष ढेरे, तांत्रिक अंमलदार एच.आर. निकम यांच्यासह अनेक अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

या दोन मिनी बसचा वापर कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी ड्युटीवर जाणारे पोलीस अंमलदार, बंदोबस्त कामी तैनात होणारे जवान, तसेच आरोपी पक्षांची ने-आण करण्यासाठी केला जाणार आहे. यामुळे पोलीस दलाच्या हालचाली अधिक गतिमान आणि शिस्तबद्ध होतील.

नव्या मिनी बस उपलब्ध



झाल्यामुळे जालना जिल्हा पोलीसांची बळकटी वाढली आहे. विशेषतः मोर्चे, आंदोलन, मोठे उत्सव आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रसंगी जवानांची जलद ने-आण होऊ शकेल. यामुळे केवळ वेळेची बचत होणार नाही तर कार्यक्षमता देखील वाढणार आहे. पोलीस **पान २ वर**

# संपादकीय

## मराठा आरक्षणाचा संघर्ष: संवाद, संयम आणि राजकीय समतोलाचा कस

मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक चर्चेत अग्रस्थानी आला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेला मोर्चा आता मुंबईच्या दिशेने रवाना झाला आहे, आणि संपूर्ण राज्याचे लक्ष या आंदोलनावर खिळले आहे. प्रश्न फक्त आरक्षणाचा नाही; हा सामाजिक न्याय, समान हक्क आणि सरकारच्या निर्णयक्षमतेचा प्रश्न आहे. संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर आला आहे. मुंबईकडे रवाना झालेला मोर्चा केवळ सामाजिक आंदोलन नाही, तर कायदेशीर आणि धोरणात्मक चौकटीतून योग्य तो मार्ग शोधण्याची तातडीची गरज अधोरेखित करतो. महाराष्ट्र सरकारसमोर आता दोन मोठी आव्हाने आहेत - कायदेशीर अडथळे दूर करणे आणि राजकीय-सामाजिक संतुलन राखणे. मागील काही वर्षांत मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी अनेक घोषणा झाल्या, समित्या बसल्या, पण अंमलबजावणीत शून्य प्रगती झाली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांनंतरही सरकारने ठोस पावले उचलली नाहीत. या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांनी शांततेत आंदोलन सुरू केले, परंतु जनसमर्थन वाढल्यावर या चळवळीने राज्यातील सत्ताधाऱ्यांना तातडीची जाणीव करून दिली. या संघर्षात सरकारने काही पावले उशीरा उचलली, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. प्रारंभी प्रशासनाने परवानग्या नाकारत कठोर भूमिका घेतली, ज्यामुळे तणाव वाढला. पण हायकोर्टाच्या आदेशानंतर आणि जनतेच्या दबावामुळे सरकारने धोरण बदलत संवादाचा मार्ग स्वीकारला. उपसमितीच्या नेतृत्वात राधाकृष्ण विखे पाटील यांची नेमणूक ही सरकारच्या संवाद साधण्याच्या इच्छेची जाणीव करून देते. मराठा समाजाला कुणबी जातीखाली ओबीसी आरक्षणाचा लाभ हवा आहे. हा मुद्दा केवळ राजकीय मागणी नसून सामाजिक-आर्थिक न्यायासाठीचा लढा आहे. आंदोलनकर्त्यांची अपेक्षा आहे की सरकारने तातडीने कायदेशीर उपाययोजना करावी. मृत आंदोलनकर्त्यांच्या कुटुंबांना न्याय आणि आर्थिक मदत देणे ही सरकारची जबाबदारी आहे. या आंदोलनाने राज्यातील सत्ताधाऱ्यांना कठीण परीक्षेत उभे केले आहे. एका बाजूला मराठा समाजाचा प्रचंड दबाव आहे. तर दुसऱ्या बाजूला इतर जइउ गटांचा विरोध आहे, ज्यांना आपले हक्क कमी होण्याची भीती वाटते. सरकारने या दोन्ही गटांचा समतोल राखणे ही खरी कसरत आहे. चुकीची भूमिका घेतल्यास राजकीय समीकरणांवर दूरगामी परिणाम होऊ शकतात. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आंदोलनाची तीव्रता वाढल्यास कायदा-सुव्यवस्था राखणे हे प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरेल. जर संवादाच्या माध्यमातून उपाय सापडला नाही, तर हा संघर्ष उग्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आगामी निवडणुकांमध्ये हा मुद्दा राजकीय अजेंड्याचा केंद्रबिंदू ठरेल, हे स्पष्ट आहे. मनोज जरांगे पाटील यांनी शांततामय संघर्षाची परंपरा पुढे नेली आहे. हे आंदोलन हिंसक न होता लोकशाही पद्धतीने पुढे जात आहे, हीच त्याची ताकद आहे. सरकारने आता टाळाटाळ न करता ठोस निर्णय घेतला पाहिजे. संवाद, कायदेशीर उपाययोजना आणि पारदर्शक प्रक्रिया हाच एकमेव मार्ग आहे. अन्यथा, महाराष्ट्रातील सामाजिक तणाव अधिक तीव्र होऊन राज्याच्या स्थैर्यावर परिणाम करू शकतो. मराठा आरक्षणाचा प्रश्न हा केवळ एका समाजाच्या आरक्षणाच्या मागणीपुरता मर्यादित नाही; हा महाराष्ट्राच्या सामाजिक संरचनेतील समतेचा आणि न्यायाचा लढा आहे. सरकारने संवादाचे दरवाजे खुले ठेवले, परंतु आता निर्णयाचे धाडस दाखवण्याची वेळ आली आहे. राजकारण आणि समाजहित यात संतुलन राखतच हा प्रश्न सोडवला, तरच संघर्षाला शांततामय शेवट मिळू शकेल.

# हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद

हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद या महान खेळाडूचा गौरव म्हणून हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते खेळाडूंना खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि द्रोणाचार्य पुरस्कारांचे वितरण केले जाते. शिवाय खेळातील सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार म्हणून २००२ पासून मेजर ध्यानचंद पुरस्कार देण्यात येतो. आपल्या कारकिर्दीत खेळात असामान्य कर्तृत्व दाखवणाऱ्या आणि निवृत्तीनंतरही त्या खेळासाठी जीवन वेचणाऱ्या क्रीडापटूला मेजर ध्यानचंद जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खेलरत्न पुरस्काराला देखील मेजर ध्यानचंद यांचे नाव देऊन मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचा यथोचित असा गौरव केला आहे. ज्या खेळाडूंनी वर्षभर सर्वोत्तम कामगिरी करून जागतिक पातळीवर देशाचे नाव उज्ज्वल केले आहे अशा खेळाडूंना हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार क्रिडा क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो.

२९ ऑगस्ट १९०५ रोजी उत्तरप्रदेश मधील अलाहाबाद येथे मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सोमेश्वर दत्त हे आर्मीमध्ये असल्याने त्यांच्या वारंवार बदल्या होत. वडिलांच्या निवृत्तीनंतर १९२२ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी ते स्वतः आमर्ीत दाखल झाले. त्यावेळी ते आर्मीच्या रेजिमेंटमध्ये होणाऱ्या हॉकी सामन्यात खेळत असे. हॉकीतील त्यांचे कौशल्य पाहून मेजर बाले तिवारी यांनी त्यांना हॉकीमधील बारकावे शिकवले. ते त्यांचे हॉकीमधील गुरू होते. पुढे मेजर ध्यानचंद हॉकीमध्ये इतके रमले की हॉकी हाच त्यांचा जीव की प्राण ठरला. १९२२ ते १९२६ या कालावधीत त्यांनी रेजिमेंटच्या विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवले. हॉकीतील त्यांच्या कर्तुत्वामुळे न्यूझीलंड दौऱ्यावर जाणाऱ्या इंडियन आर्मी संघात त्यांची निवड झाली. हा दौरा त्यांनी गाजवला. या दौऱ्यात त्यांनी आपल्या संघाला १८ विजय मिळवून दिले. दोन लढती बरोबरीत सुटल्या तर केवळ एका लढतीत पराभव स्वीकारला. हा दौरा त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. या दौऱ्याने त्यांना जगभर नाव मिळवून दिले. या दौऱ्यानंतर त्यांना लान्स नायक म्हणून बढती मिळाली. केवळ भारतातीलच नाही तर जगभरातील दिग्गज खेळाडू त्यांच्या खेळाच्या प्रेमात पडले. मेजर ध्यानचंद यांचे हॉकी खेळण्याचे कौशल्य अफलातून होते. चेंडूवरचे नियंत्रण ही त्यांची खासियत होती. चेंडू त्यांच्या ताब्यात असताना, मैदानात कोणी खेळत नाही असेच वाटायचे. चेंडू त्यांच्या स्टीक जवळून हलतच नसे म्हणून त्यांच्या स्टिकमध्ये चुंबक बसवला आहे अशी अफवा तेंव्हा पसरली होती. हॉकी हा सांघिक खेळ आहे तो संघ भावनेनेच खेळला पाहिजे असे त्यांचे मत होते म्हणूनच चेंडूवर अफलातून नियंत्रण असूनही ते आपल्या सहकाऱ्यांना अचूक पास द्यायचे. हॉकीतील त्यांच्या या कौशल्यामुळेच त्यांना हॉकीचे जादूगार असे म्हटले जाते. मेजर ध्यानचंद यांनी आपल्या जादुई खेळाने देशाला १९२८ ( एमस्टरडॅम ) १९३१ ( लॉस अँजेलीस ) १९३६ ( बर्लिन ) अशा सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकून दिले होते. १९३६ मधील भारत जर्मनी यांच्यात झालेल्या ऑलिम्पिकच्या अंतिम लढतीत ध्यानचंद यांनी एकहाती विजय मिळवून दिला होता. ही लढत पाहायला जर्मनीचे हुकूमशहा एडॉल्फ हिटलर उपस्थित होते. ध्यानचंद यांच्या खेळाने ते चांगलेच प्रभावित झाले. ध्यानचंद यांच्या हॉकीतील कौशल्याने जर्मनीचा हुकूमशहा एडॉल्फ हिटलर यांनाही वेड लावले होते. त्यांच्या असामान्य कौशल्याने भारावलेल्या हिटलर यांनी त्यांना जर्मन नागरिकत्व देण्याची तसेच इंग्लिश इंडियन आर्मीत मेजरपद व कर्नल पदापर्यंत बढती देण्याचीही ऑफर दिली होती ; पण देशप्रेमी आणि स्वाभिमानी ध्यानचंद यांनी ती नम्रपणे नाकारली होती. लॉस अँजेलीस मध्ये खेळलेल्या भारतीय संघाचे वर्णन एका अमेरिकन पत्रकाराने पूर्वेकडील वादळ असे केले होते. ध्यानचंद १९५६ मध्ये निवृत्त झाले. त्याचवर्षी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण देऊन गौरवले. निवृत्तीनंतर पटियाला येथील क्रीडा संस्थेत मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी तरुण खेळाडूंना प्रशिक्षण दिले. ३ डिसेंबर १९७९ रोजी या महान खेळाडूचे निधन झाले. भारताला सुवर्णयुगाची अनुभूती देणाऱ्या या महान हॉकीच्या जादूगाराला मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने गौरवावे अशीच तमाम भारतीय क्रीडा रसिकांची इच्छा आहे. हॉकीचे जादुगर मेजर ध्यानचंद यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विविध विकास कामांच्या मागण्यासंदर्भात चर्चा



**परतूर । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत जालना जिल्हा संघटक विठ्ठलराव बरकुले यांनी विविध कामांच्या मागण्या संदर्भात चर्चा केली असता त्यांनी उपविभागीय बांधकाम विभाग कार्यालय परतूरला देण्यात यावे.आणि अपंगांसाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र ऑफिस आसने गरजेचे आहे. यावर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी राष्ट्रवादीचे जुने शिलेदार म्हणजेच माजी तालुकाध्यक्ष, सोसायटी चेअरमन, सरपंच, उपसरपंच, माजी सदस्य ग्रामपंचायत, मार्केट कमिटीचे संचालक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य यांच्यावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ देणार नाही असे मत दादांनी व्यक्त केले.गर्जे साहेब यांच्या समोर दादांनी कार्यालयात सूचना देऊन सांगितले परतूर मंठा विधानसभेतून जास्तीत जास्त जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य निवडून येतील दादाला अवगत केले. यावेळी मा.सदाभाऊ शिरसाट सामाजिक न्याय विभाग जिल्हा उपाध्यक्ष जालना यांची उपस्थिती होती.

## मुंबई झोपडपट्टी पोलीस पंचायत धारावीतर्फे आरती संग्रहाचे वाटप!



**मुबंई । प्रतिनिधी -** मागील दोन वर्षापासून गणेशोत्सवात मुंबई झोपडपट्टी पोलीस पंचायत धारावी बीट नंबर दोन तर्फे गणेश भक्तांना साप्ताहिक भगवे वादळ संचालित आरती संग्रहाचे वाटप करण्यात येते.याही वर्षी दिनांक २७ऑगस्ट २०२५ रोजी बीट कार्यालय समोर धारावी येथे शेकडो गणेश भक्त व कुटुंबांना आरती संग्रहाचे वाटप करण्यात आले. यावेळी संत कक्कया मार्गावरून येना जाणाऱ्या गणेश भक्त व श्री ची मूर्ती घेऊन जाणारे कुटुंब या सर्वांना आरती संग्रहाचे वाटप करण्यात आले.या कामी संपादक श्री दत्ता श्रावण खंदारे यांचे सहकार्य लाभले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक श्री दिलीप गाडेकर,अलका साबळे,सविता शेरखाने,नामदेव आबनावे,शंकर पोटे, सुनीता चव्हाण, ममताबाई कदम,गिरीराज शेरखाने, किरण खंदारे, गौतम होटकर, शंकर गोपीर्डे या सर्व कार्यकर्त्यांनी गणेश उत्सवातील भक्तांची व कुटुंबांची भेट घेऊन आरती संग्रहाचे वाटप केले. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या धारावीच्या विकासाला गती द्या अशी विनंती वजा मागणी साकडं श्रीगणेशेकडे घातले अशी माहिती संयोजक श्री दिलीप गाडेकर यांनी दिली

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जाफराबाद शहर अल्पसंख्यांकपदी शेख मोहसीन

**जाफराबाद । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक च्या जाफराबाद शहर अध्यक्ष पदी शेख मोहसीन शेख यासीन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गटाचे जालना जिल्हा अध्यक्ष मा. आमदार अरविंद अण्णा चव्हाण यांच्या शिफारस वरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक चे जिल्हा अध्यक्ष शाह आलम खान यांनी केली.या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष फारुख कुरेशी, व पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. शेख मोहसीन यांचे ता. अध्यक्ष दत्तू पाटील, ता. कार्याध्यक्ष ड सचिन सोरमारे,ता . उपाध्यक्ष मा. नगरसेवक बाळकृष्ण हिवाळे, युवक तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर गाडे,शेख जावेद, भागाजी गाडेकर, संदीप पाटील कड, गजानन पाटील, आदींनी अभिनंदन केले.



## गुणवत्ता विकास कार्यशाळा

**पुणे -** जिल्हा परिषद, पुणे पंचायत समिती दौंड ( शिक्षण विभाग ) तालुकास्तरीय गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत कार्यशाळा श्री. कृष्ण मंगल कार्यालय.चौफुला, दौंड येथे दि. २८ / ०८ / २०२५ रोजी मा. संजय महाजन गटशिक्षणाधिकारी, दौंड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

सदर कार्यशाळेत विविध विषयांवर मार्गदर्शन झाले. उल्लास - नव भारत साक्षरता कार्यक्रम दौंड विकास गटात राबविला जातो. सन २०२३ / २४ व २०२४ / २५ मध्ये उत्कृष्ठ काम झाले आहे. १ ) नंदा चौधरी ( हरिबाची वाडी ) २ ) कमल जाधव ( भागवतवाडी ) यांना प्रातिनिधीक स्वरुपात प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. २१ सप्टें २०२५ रोजीचे तालुक्याचे उदिष्ट १७९१ असून आज रोजी ८०० पुर्ण झाले आहे. उर्वरित एका आठवडयात पूर्ण होईल. सर्व शाळांनी १५ ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत केले आहे. या विषयावर कार्यशाळेत तालुका समन्वयक - श्री. दत्तात्रय कुदळे यांनी मार्गदर्शन केले.

पान १ वरुन

### श्री गणेशा आरोग्याचा ...

रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत.

नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे. ‘श्री गणेशा आरोग्याचा’ या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत. हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

### नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी ...

उपाध्यक्षपदी भाऊसाहेब पांडूरंग जाधव,अवधुत रामभाऊ खडके, आशाताई एकनाथ माळी,परिक्षीत किसनराव शिंदे, गणेश किसनराव खवणे, शिवाजी रावसाहेब बोबडे, पदमाकर प्रल्हादराव जऱ्हाड, शंकर नारायण लहामंगे, जिजाबाई उकाजी जाधव,विरेंद्र अमरचंदजी धोका तर भाजपा जिल्हा सरचिटणीसपदी अनिलराव दादाराव कोलते, तारामती बाबासाहेब खरात,गणेश नारायण ठाले,रमेश अनिलराव भापकर,गोविंद नामदेव ढेंबरे व भाजपा जिल्हा चिटणीसपदी सचिन उत्तमराव जाधव,हरिश्चंद्र बापुराव शिंदे,राजेश हिंम्मतराव चव्हाण,एकनाथ शंकरराव मोरे, शोभाबाई अशोक देशमुख, गंगासागर नंदकिशोर पिंगळे, ज्योतीताई दिपक ठाकुर, द्वारकाताई देविदास मेहेत्रे, राजु निवृत्ती साळवे, प्रकाश शामराव ढवळे व भाजपा जिल्हा कोषाध्यक्षपदी कल्याण रावसाहेब काळे व भाजपा जिल्हा प्रसिध्दीप्रमुखपदी बाबासाहेब कचरु कोलते व कार्यालयप्रमुखपदी एकनाथ कारभारी कानुले व भाजपा जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी राजेंद्र देशमुख,मुकेश चिने,गणेश फके, शिवाजीराव थोटे, तुकाराम जाधव,महेश जोशी, विलास आडगावकर, मधुकर गाढे, साहेबराव कानडजे, संतोष लोखंडे, गजानन घाडगे, अरुणराव अवकाळे, गोविंदराव पंडीत,सुधीर पाटील,भिमराव भुंजग,रमेश जऱ्हाड, राम शिंदे, सुपडसिंग जगरवाल,भिमराव जावळे, शिवाजी शिंदे,राजेंद्र फटाले, गणेश चव्हाण,गौरखनाथ खैरे, सत्यनारायण गिल्डा,बबनराव सिरसाठ,ईश्वर जाधव,सुखलाल गहेराव,जितेंद्र पालकर, प्रल्हाद पाटील, भाऊसाहेब आरसुळ, बद्रीनारायण जऱ्हाड,अरुण उपाध्ये,योगेश देशमुख, अनिरुध्द झिजुंर्डे,विष्णु जाधव,संजय तौर,अशोक राजे जाधव,पंजाबराव बोराडे, संदीप गोरे,बाबुराव खरात,आशाताई पांडे पाटील,शोभाताई मतकर,वंदनाताई खाकरे,वैशाली कासोद,अम्रपाली साबळे,मंगल बारगाजे, वैशाली जऱ्हाड,चित्राताई पवार,अर्चना डाके, स.यास्मीन बेगम स.मुज्जमील,आशा पांढरे,उषाताई पवार,अश्विनाताई काथोटे, सुनिता मोरे,उषाताई तोडावत,अरुणाताई वाघ,छायाताई मने,अनिता देशमुख,कविता बनकर,पुजा काकडे,आशाताई मुळे, सुशिलाताई पवार, संगीता देवकते,भाऊसाहेब काकडे आदींची निवड करण्यात आली असून नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

### शासकीय कामकाजात ...

जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी, तहसीलदार अनिल नव्हाते, तहसीलदार प्रणाली तायडे यांची उपस्थिती होती. यावेळी एमकेसीएलचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक विनायक कदम यांनी ए. आय. आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सविस्तर प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणास महसूल अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जालना पोलीस ...

अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी सांगितले की, जालना जिल्ह्यात वाढत्या लोकसंख्या व गतिमान सामाजिक परिस्थितीमुळे पोलीस दलावर कामाचा ताण वाढत आहे. नव्या मिनी बसच्या उपलब्धतेमुळे पोलीस दलाला नागरिकांची सुरक्षा अधिक प्रभावीपणे करता येईल.

जालना पोलीस दलाला मिळालेल्या या दोन नव्या मिनी बस या केवळ वाहनांची भर नाही, तर जिल्ह्याच्या सुरक्षा व्यवस्थेला मिळालेले नवीन बळ आहे. कायदा व सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि तातडीच्या ड्युटी प्रभावीपणे पार पाडण्यासाठी या मिनी बस निर्णायक ठरणार आहेत.

## शालेय विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी व मार्गदर्शन

# योग्य सवयी अंगीकारल्यास दातांचे आयुष्यभर रक्षण करता येते - डॉ. नीलिमा धन्नावत




**जालना । प्रतिनिधी -** शहरातील राष्ट्रीय हिंदी विद्यालय इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित मोफत दंत तपासणी शिबिरात दंतरोग तज्ञ डॉ. सौ. नीलिमा योगेश धन्नावत व डॉ. कु. दिशा संदीप धन्नावत यांनी प्राथमिक व पूर्वप्राथमिक विभागातील सुमारे चारशे विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांना दातांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन केले.

गुरुवार दि. २८ ऑगस्ट रोजी पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटन विद्यालयाचे अध्यक्ष सतीश बगडिया यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुण्या म्हणून बाल न्याय मंडळाच्या सदस्य ड. अश्विनी धन्नावत व विद्यालयाच्या प्राचार्या सौ. रीता टंडन यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. सौ. नीलिमा धन्नावत म्हणाल्या की, लहान वयातच योग्य सवयी अंगीकारल्या तर दातांचे आयुष्यभर रक्षण करता येते. मुलांनी दिवसातून दोनवेळा ब्रश करणे, गोड पदार्थांचे सेवन मर्यादित ठेवणे आणि दंतचिकित्सकांचा नियमित सल्ला घेणे आवश्यक आहे. डॉ. कु. दिशा धन्नावत यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये दंत आरोग्याबाबत जागरूकता वाढवणे ही काळाची गरज आहे. दूधाचे दात जरी पडणारे असले तरी त्यांची योग्य काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. निरोगी दातांमुळेच निरोगी शरीर व आत्मविश्वास निर्माण होतो. शिबिराच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्ह्यातील आर्थिक दुर्बल घटकातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी कलश सीड्स शिष्यवृत्ती योजना

## गरजूंनी लाभ घेण्याचे सुरेश अग्रवाल व समीर अग्रवाल यांचे आवाहन

जालना । प्रतिनिधी : कलश सीड्स फाउंडेशनतर्फे जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता आर्थिक दुर्बल घटकातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी एकूण १८ व्यावसायिक कोर्सेससाठी कलश सीड्स शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आली असून, दहावी किंवा बारावीची परीक्षा जालना जिल्ह्यातून दिलेली असावी आणि अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपयांच्या आत असावे ही, या योजनेची प्रमुख अट आहे. यावर्षी सदर कोर्सेससाठी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांनी या योजनेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन कलश सीड्सचे चेअरमन सुरेश अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक समीर अग्रवाल, संचालिका सौ. वर्षा अग्रवाल यांनी केले आहे.

Kalash

एमबीबीएस, इंजीनियरिंग, एम.टेक. आयसीटी जालना, सीए/ सीएस/आयसीडब्ल्यूए फाउंडेशन, सीए/सीएस/ आयसीडब्ल्यूए प्रथम आणि द्वितीय वर्ष, एलएलबी (पाच वर्षाचा एकत्रित अभ्यासक्रम), बी.फार्मसी, बी.एस्सी. एग्रीकल्चर, बी.एस्सी. नर्सिंग, पॉलिटेक्निक आणि आयटीआय आदी १८ कोर्सेससाठी ही शिष्यवृत्ती योजना आहे. यावर्षी ३०० पेक्षा अधिक पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जाणार आहे. ऑनलाइन अर्ज प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांची निवड ही शैक्षणिक गुणवत्तेनुसार तसेच समितीमार्फत घेण्यात येणाऱ्या मुलाखती आणि प्रत्यक्ष घरभेटीच्या तपासणीनंतर केली जाणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी जालना कलश सीड्स फाउंडेशनतर्फे अधिकृतपणे जाहीर केली जाऊन विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल.

अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख १२ सप्टेंबर ही असून पात्रता, निवडीचे निकष आणि अधिक माहितीसाठी जालना शहरातील व्यंकटेशनगरमधील जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या कार्यालयात अथवा या योजनेचे प्रकल्प समन्वयक रुक्मिणीकांत दीक्षित (मो. ९४०४६०७५७५) व दिलीप केंद्रे (मो. ७०२०५१८७६८ यांच्याशी संपर्क साधून गरजू व होतकरू विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन कलश सीड्सचे चेअरमन सुरेश अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक समीर सुरेश अग्रवाल, संचालिका सौ. वर्षा समीर अग्रवाल आणि जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी यांनी केले आहे.

## सार्वजनिक ग्रंथालयांनी पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना -** जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक (ग्रंथमित्र) यांनी शासनाच्या विविध पुरस्कारासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जालना यांच्याकडे दि.३० सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे. शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून पुरस्कार देण्यात येतो. शहरी व ग्रामीण भागातील अ, ब, क आणि ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख, ७५ हजार, ५० हजार आणि २५ हजार रुपये रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देवून गौरविण्यात येत असते. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## आजचे राशीभविष्य

**मेष:** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला आहे. आर्थिक बाबतीत तुम्हाला लाभ होण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी नवीन संधी मिळतील, ज्यामुळे तुमची प्रगती होईल. कुटुंबासोबत वेळ घालवल्याने मन आनंदी राहील. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ:** आज तुम्हाला काही महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील. कामामध्ये अडचणी येऊ शकतात, परंतु तुम्ही तुमच्या मेहनतीने त्यावर मात कराल. आर्थिक व्यवहार जपून करा. संध्याकाळी मित्रांसोबत बाहेर जाण्याचा योग आहे.

**मिथुन:** आजचा दिवस तुमच्यासाठी फलदायी ठरेल. रखडलेली कामे मार्गी लागतील. विद्यार्थ्यांना अभ्यासात यश मिळेल. प्रेमसंबंधात गोडवा येईल. आरोग्याच्या दृष्टीने दिवस सामान्य आहे.

**कर्क:** आज तुम्हाला मानसिक तणाव जाणवू शकतो. जास्त विचार केल्याने कामावर परिणाम होईल. शांत राहून कामे हाताळा. कुटुंबातील सदस्यांसोबत वाद टाळा. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**सिंह:** आज तुम्ही उत्साहात असाल. कामाच्या ठिकाणी तुमच्या कामाचे कौतुक होईल. नवीन लोकांशी संपर्क वाढेल, ज्यामुळे भविष्यात फायदा होईल. आर्थिक लाभाची शक्यता आहे.

**कन्या:** आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ आहे. तुमच्या विचारांना योग्य दिशा मिळेल. करिअरमध्ये पुढे जाण्याची संधी मिळेल. कुटुंबासोबत आनंदाचे क्षण अनुभवाल. आरोग्याकडे लक्ष द्या.

**तूळ:** आज तुम्हाला थोडे सावध राहावे लागेल. महत्त्वाचे निर्णय घेताना विचारपूर्वक घ्या. कोणाशीही वाद घालू नका. आर्थिक बाबतीत खर्च वाढू शकतो, त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक:** आज तुमच्या कामात यश मिळेल. तुमचे धैर्य आणि आत्मविश्वास तुम्हाला प्रत्येक समस्येतून बाहेर काढेल. अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील व्यक्ती तुम्हाला सहकार्य करतील.

**धनु:** आज तुम्हाला काही अडथळ्यांचा सामना करावा लागेल. परंतु, तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित केल्यास यश नक्की मिळेल. अनावश्यक खर्च टाळा. जोडीदारासोबतचे संबंध चांगले राहतील.

**मकर:** आजचा दिवस तुमच्यासाठी उत्तम आहे. तुमचे आरोग्य चांगले राहील. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक गुंतवणुकीतून फायदा होईल.

**कुंभ:** आज तुम्हाला काही नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. कामाच्या ठिकाणी तुमच्या कौशल्याची परीक्षा होईल. कुटुंबासोबत चांगला वेळ घालवाल. अचानक प्रवास घडण्याची शक्यता आहे.

**मीन:** आज तुम्ही भावूक होऊ शकता. कोणताही निर्णय घेताना भावनिक होऊन घेऊ नका. कामाच्या ठिकाणी शांत राहा. आर्थिक बाबतीत काळजीपूर्वक व्यवहार करा. ध्यान आणि योग केल्यास मानसिक शांती मिळेल.

**टीप:** हे सामान्य राशी भविष्य आहे. प्रत्येक व्यक्तीच्या कुंडलीनुसार त्यात बदल होऊ शकतो. अधिक माहितीसाठी तुम्ही ज्योतिषाचा सल्ला घेऊ शकता.

# शासकीय योजनांचा लाभ घ्यावा

## बठाण ग्रामस्थांशी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी साधला संवाद

**जालना । प्रतिनिधी -** सर्वसामान्य जनतेच्या अडचणी तसेच तक्रारीचे निराकरण करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी आज जनसंवाद कार्यक्रमांतर्गत अंबड तालूक्यातील बठाण या गावाला भेट देवून नागरिकांशी संवाद साधला. यावेळी श्रीमती मैत्रेवार यांनी भेटीत गावकऱ्यांच्या रस्ते, पाणी, वीज, रॅशन, शिक्षण या मुलभूत अडचणी व समस्या जाणून घेतल्या. तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यासंबंधी येणारे अडथळे, तसेच स्थानिक विकासाशी संबंधीत विविध मागण्याची माहिती ही घेतली.

यावेळी सरपंच भगवान इंगळे, मंडळ अधिकारी, केंद्र प्रमुख, तलाठी, कृषी सहायक ग्राम विकास अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार म्हणाल्या की, बठाण गावातील नागरिकांनी विकासाच्या कामाबाबत आपल्या संकल्पना शासनास सुचवाव्यात, त्यानूसार प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात येईल. आज येथे जनसंवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रत्यक्ष समस्या सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहेत. ग्रामस्तरावरील विविध विभागांचे अधिकारी या कार्यक्रमात उपस्थित असून, प्रलंबित व अपेक्षित असलेली विविध कामे तात्काळ सोडविण्यासाठी जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी श्रीमती मैत्रेवार यांनी नागरिकांच्या तक्रारी व सूचना ऐकून तातडीने कार्यवाही करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश दिले.

यावेळी शेत रस्ते विषयक प्रकरणे, स्वस्त धान्य दुकान, फेर-फार नोंदी, संजय गांधी निराधार अनुदान योजना, पांदण रस्ता, शिवरस्ता मोकळा करणे, घरकुल योजना, ई-पीक पाहणी, अंगणवाडी, आरोग्य सेवा आदी योजनांची विषयी बठाण ग्रामस्थांना माहिति देवून त्यांच्या अडचणीचे निराकरण जनसंवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले. तसेच जागेवर सोडवणूक होणाऱ्या प्रकरणांचे निराकरण करण्यात आले. तसेच तालुका, जिल्हा, विभागीय आणि शासन स्तरावरील प्रकरणे सोडवणूक करण्यासाठी संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आली.

यावेळी बठाण येथील ग्रामस्थांनी गावाला जोडणारा मुख्य रस्ता करण्याची मागणी केली. तसेच नदीचे खोलीकरण करुन बंधाऱ्यावर गेट बसवून देणे, शाळेत शिक्षक उपलब्ध करुन देणे तसेच पर्यटन योजनेअंतर्गत गावातील मंदीराचा विकास करुन देण्याची मागणी केली. यावर श्रीमती मैत्रेवार यांनी संबंधीत विभागास याबाबत पाठपूरावा करुन सदर मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे सांगितले. जनसंवाद कार्यक्रमास यावेळी मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती

# टेंभुर्णी ग्रामीण रुग्णालयाचे अधिकारी, कर्मचारी संपात सहभागी

**विशाल देशमुख टेंभूर्णी -** आपल्या विविध मागण्या मान्य न झाल्यामुळे राज्यातील आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी कर्मचारी एकत्रिकरण समितीच्या नेतृत्वात बेमुदत संप पुकारला असून टेंभुर्णी ता. जाफराबाद येथील ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी देखील मंगळवार ता. २६ पासून या बेमुदत संपात सहभागी झाले आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नियमित सेवा समायोजन शासन निर्णय २०२४ ची अंमलबजावणी करण्यात यावी यासह



विविध मागण्यांसाठी हा संप पुकारण्यात आला आहे. टेंभुर्णी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनावर डॉ. शिवहरी जायभाये, डॉ.जुबेर शेख, आर. आर वानखेडे, मल्हारी उमाप, सचिन सुर्वे, ए. जी. अंभोरे, पी . डी.सपकाळ, एस. आर. पठाडे पी.जी सोज्वळ, जी. जे. खंदारे पी.डी .काळे यांच्या सह्या आहेत. धोंडीराम कवटकर यांनी निवेदन स्वीकारले.




**सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी आ. अर्जुनराव खोतकर यांच्या निवासस्थानी भेट दिली असता यावेळी शिवसेना नेते दिनकर घेवंदे यांनी त्यांचे संविधान देऊन स्वागत केले आणि राजकीय आणि सामाजिक चर्चा केली.**

दीपस्तंभ रेमेडी

http://exclusivemaharashtra.com/
https://www.lokadhikarlive.com/
https://arjunastra.in/



वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
वेब पोर्टल, युट्युब चॅनल
वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय

वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन

9975387225 8390098886

## जोरदार पावसात आमदार बबनराव लोणीकर मिरवणुकीत सहभागी; गणेश भक्तांकडून कौतुक; मंठ्यात जय श्रीराम गणेश मंडळाच्या श्री गणेश मूर्तीची स्थापना

# गणेशोत्सव हा आपल्या संस्कृतीचा आणि परंपरेचा अविभाज्य भाग - आ. लोणीकर

**मंठा । प्रतिनिधी -** गणपती बाप्पाचे प्रत्येकाच्या घरी आगमन होणार आहे. गणेशोत्सवाचे महत्त्व अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक स्वरूपाचे आहे. बुद्धी, समृद्धी आणि अडथळे दूर करणारा देव गणपती बाप्पाचा उत्सव साजरा केला जातो. गणेशोत्सवामुळे समाजात ऐक्याची भावना वाढते आणि लोकांना एकत्र आणण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. गणपती बाप्पाला बुद्धीचा देव आणि विघ्नहर्ता म्हणून ओळखले जाते. गणपतीला प्रसन्न केल्याने घरात सुख-समृद्धी व शांती प्रस्थापित होते, अशी श्रद्धा आहे. देशभरासह विशेषतः महाराष्ट्र गणेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते, पूजा-अर्चा होते आणि त्याला मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. लोकमान्य टिळक यांनी १८९३ मध्ये या उत्सवाला सामाजिक आणि सार्वजनिक स्वरूप देऊन लोकजागृतीसाठी एक माध्यम म्हणून वापरले असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

मंठा येथे छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मंठा अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली होती यादरम्यान गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया अशा जयघोशात ढोलताशांच्या गजरात आणि आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गणरायांचा आगमन झाले. यावेळी बोलताना लोणीकर म्हणाले की, या उत्सवामुळे संपूर्ण हिंदू समाज एकत्र येतो आणि एकतेची भावना वाढते. गणेशोत्सव हा केवळ एक धार्मिक सण नसून तो एक सांस्कृतिक आणि सामाजिक उत्सव आहे. यातून बुद्धी, समृद्धी, ऐक्य आणि सामाजिक एकोपा या मूल्यांना चालना मिळते. महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक धोरणानुसार २०२५ यावर्षीपासून गणेश उत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा देण्यात आलेला आहे. यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी सर्व गणेश भक्तांना माता-भगिनींना गणेश उत्सवाच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या, सर्व शेतकरी कष्टकरी यांच्यासह आपल्या सर्वांना गणपती बाप्पा सुख समृद्धी यश कीर्ती देवो हीच गणरायांच्या चरणी प्रार्थना केली असल्याचे यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

गणेश चतुर्थीच्या शुभ पर्वावर मंठा शहरातील जय श्रीराम गणेश मंडळाच्या वतीने श्री गणेश मूर्तीची स्थापना सोहळा माजीमंत्री बबनराव लोणीकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. आमदार लोणीकर यांच्या शुभहस्ते श्री गणेशाची पहिली आरती करण्यात आली, ज्यामुळे मंठा शहरातील गणेश भक्तांमध्ये उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले. जय श्रीराम गणेश मंडळाने आयोजित केलेल्या या सोहळ्यात श्री गणेश मूर्तीची स्थापना पारंपरिक पद्धतीने आणि विधिवत पूजनाने करण्यात आली. मंठा शहरामध्ये जालना नांदेड राष्ट्रीय महामार्गावर बऱ्याच दिवसांपासून उभारण्यात आलेल्या पथदिव्यांना सुरू करण्यासाठी अनेक अडचण निर्माण होत होत्या त्या अडचणी दूर करत आमदार बबनराव लोणीकर यांनी १०० चे २ ट्रांसफार्मर देऊन अडचण दूर केली व गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर मंठा शहर प्रकाशमान झाले. राष्ट्रीय महामार्गावरील लख्ख प्रकाशाने मंठा शहर उजळून निघाले होते.

मंठा शहरातील प्रमुख रस्त्यांवरून भव्य मिरवणुकीनंतर मंडळाच्या ठिकाणी मूर्ती स्थापनेचा कार्यक्रम पार पडला. ढोल-ताशांचा गजर, फुलांच्या मालांनी सजलेली मूर्ती आणि भक्तांचा गणपती बाप्पा मोरया! चा जयघोष यामुळे संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणात न्हाले. आमदार बबनराव लोणीकर यांनी मूर्ती स्थापनेनंतर पहिली आरती करून गणरायाला वंदन केले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. आपल्या भाषणात भाषणात गणेशोत्सवाच्या महत्त्वावर प्रकाश टाकताना सांगितले, गणेशोत्सव हा भक्ती, एकता आणि सामाजिक समरसतेचा महान उत्सव आहे. श्री गणरायाच्या आशीर्वादाने आपल्या शेतकऱ्यांना सुख, समाधान आणि समृद्धी प्राप्त होवो. तसेच, महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साध्य व्हावा, हीच विघ्नहर्त्या गणरायाच्या चरणी प्रार्थना आहे. त्यांनी मंठा शहरातील सर्व नागरिकांना या उत्सवात उत्साहाने सहभागी होऊन सामाजिक बंध मजबूत करण्याचे आवाहन देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी केले.

जय श्रीराम गणेश मंडळाने यंदाही अभिनव उपक्रम राबवून मंठा शहराच्या सांस्कृतिक परंपरेला उजाळा दिला. मूर्ती स्थापना, मिरवणूक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी शहरात धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले आहे. आमदार लोणीकर यांनी सर्वांना गणपती बाप्पाच्या आशीर्वादाने शहर आणि राज्याच्या प्रगतीसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. गणेशोत्सव हा आपल्या संस्कृतीचा आणि परंपरेचा अविभाज्य भाग आहे. या उत्सवाच्या निमित्ताने आपण सर्वांनी सामाजिक ऐक्य आणि विकासासाठी एकत्र यावे, असे त्यांनी नमूद केले. मंठा शहरातील नागरिकांनी या मूर्ती स्थापना सोहळ्यात आणि मिरवणुकीत उत्साहाने सहभाग घेतला.

मंठा शहरामध्ये धुवाधार पाऊस सुरू असताना आमदार बबनराव लोणीकर मिरवणुकीमध्ये सहभागी झाले व पुढच्या पावसात गणरायांच्या आगमनानिमित्त आयोजित मिरवणुकीमध्ये सहभागी झाल्याबद्दल मंठातील गणेश भक्तांसह अनेकांनी आमदार बबनराव लोणीकर यांचे कौतुक केले. भक्तांनी फुले उधळून, आरती करून आणि गणपती बाप्पा मोरया! च्या जयघोषाने श्री गणरायाचे स्वागत केले. या सोहळ्याने मंठा शहरातील सामाजिक आणि सांस्कृतिक वैभव पुन्हा एकदा अधोरेखित झाले. जय श्रीराम गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आणि भाजपाच्या स्थानिक नेत्यांनी या यशस्वी आयोजनासाठी सर्वांचे कौतुक मिळवले. मंठा शहरातील जय श्रीराम गणेश मंडळाच्या श्री गणेश मूर्ती स्थापना सोहळ्याने आणि आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते झालेल्या पहिल्या आरतीने शहरात भक्ती आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी गणेशराव खवणे सतीशराव निर्वळ तालुकाध्यक्ष नितीन राठोड



शहराध्यक्ष दीपक बोराडे पंजाबराव बोराडे राजेश मोरे कैलास बोराडे वैजनाथ बोराडे अजय अवचार प्रसादराव बोराडे सचिन बोराडे अमोल मोरे तोफिक कुरेशी विठ्ठलराव काळे दौलत शहाणे लक्ष्मण बोराडे मनोज देशमुख पांडुरंग चव्हाळ वैभव नरवडे कपिल तिवारी मुसा कुरेशी शबाब कुरेशी शिराज पठाण मुस्तफा पठाण शेख रहीम विजय गायकवाड तानाजी शेंडगे उमेश वायाळ नरेंद्र ताठे शरद पाटील परमेश्वर शिंदे सोपान वायाळ वसंत बागल संतोष बोराडे कैलास चव्हाण आकाश राऊत श्री चव्हाण जय श्री राम गणेश मंडळाचे अध्यक्ष - विजय बोराडे , उपाध्यक्ष - राजेभाऊ बोराडे, महेश बोराडे, लक्ष्मण बोराडे, श्री चव्हाण, सचिव - पवन बोराडे, निखिल बोराडे, आकाश राऊत, पवन मोरे, सह सचिव - प्रदीप बोराडे, अर्जुन बोराडे,भगवान कुलकर्णी, राज खनपटे,कोषाध्यक्ष - विनोद गायकवाड,राजेश घुले,अर्जुन बोराडे,सह कोषाध्यक्ष - उमेश वायाळ , अभिजीत कोदंडे, ईश्वर आघाम यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## ग्रामीण क्रीडांगणातून जिल्हास्तरीय झेप

# ऋषी महाराज विद्यालयाच्या खेळाडूंचा डंका



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** बावणे पांगरी (ता. बदनापूर) येथील ऋषी महाराज आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय या शाळेच्या क्रिकेटपटूंनी कर्तृत्वाची नवी शिखरे गाठली आहेत. दि. २६ ऑगस्ट रोजी बदनापूर येथील जिल्हा शासकीय निवासी शाळेत झालेल्या तालुकास्तरीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत या शाळेच्या मुलांच्या १४ वर्षे वयोगटातील संघाने तसेच मुलींच्या १९ वर्षे वयोगटातील संघाने तालुका स्तरावर दणदणीत विजय मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

गावातील साध्या सोयीसुविधांमध्ये खेळाचा सराव करणाऱ्या या विद्यार्थ्यांनी कष्ट, जिद्द आणि संघभावनेच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांना पराभूत केले. ग्रामीण भागातील खेळाडूंनी शालेय स्तरावरच नव्हे तर जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळवणे ही एक मोठी उपलब्धी मानली जात आहे.

विजयाच्या बातमीने शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव बोडखे, सचिव प्रवीण सुभाषराव बोडखे, उपाध्यक्ष सारंगधर बापू बोडखे, प्राचार्य कृष्णा जाधव, उपप्राचार्य संदीप सोनुने तसेच क्रीडा शिक्षक गुलाब राठोड आणि शिक्षकवर्गाने विजयी खेळाडूंना अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर शाळेचा झेंडा उंचावण्याचा निर्धार व्यक्त केला.

१४ वर्षे वयोगटातील विजयी मुलांचा संघ, सुरज बाबासाहेब इंदलकर (कर्णधार) शिवराज आप्पासाहेब शिंदे (उपकर्णधार), समर्थ गोपीचंद कदम, यश परमेश्वर हिवाळे, वरून बालासाहेब शिंदे, सोहम गजानन बावणे, अजय बाबासाहेब काकडे, आदर्श एकनाथ हिवाळे, रोहन किशोर महाडिक, संभाजी गणेश महाडिक, १९ वर्षे वयोगटातील विजयी मुलींचा संघात साक्षी दीपक शिरसाट (कर्णधार), गायत्री संतोष हिवाळे (उपकर्णधार), निशा सदाशिव अंभोरे, अक्षरा बाबासाहेब उजाड, सारिका गणपत पवार, सृष्टी भागचंद कदम, धनश्री सखाराम कदम

संस्थेतील शिक्षकवर्ग, पालक आणि स्थानिक ग्रामस्थांनी विजयी संघांचे कौतुक केले. या मुलांनी जिल्हास्तरीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचा आणि तालुक्याचा मान उंचावावा, अशा शुभेच्छा क्रीडा शिक्षक गुलाब राठोड यांनी दिल्या.

या यशामुळे शाळेतील क्रीडा विभागात उत्साहाचे वातावरण असून, आता जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी अधिक मेहनत घेण्याचा संकल्प सर्व खेळाडूंनी केला आहे.

# वंदे भारत ट्रेन छत्रपती संभाजीनगरऐवजी जालना येथून सुरू करावी; जालना रेल्वे संघर्ष समितीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** पुढील काही महिन्यांत नवीन वंदे भारत एक्सप्रेस ट्रेन छत्रपती संभाजीनगर येथून सुरू करण्याचा रेल्वे विभागाचा निर्णय आहे. मात्र ही ट्रेन जालना येथून सुरू करावी, अशी ठाम मागणी रेल्वे संघर्ष समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुभाष देविदान यांनी केली आहे.



जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने हॉटेल विजय विलास येथे सुभाषजी देविदान यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, अहमदाबाद व सुरत येथे व्यापारी वर्गाचे नेहमीच व्यवहारानिमित्त काम पडते. मात्र या शहरांसाठी मराठवाड्यातून कोणतीही रेल्वे सोय उपलब्ध नाही. त्यामुळे वंदे भारत ट्रेन जालना येथून सुरू झाल्यास संपूर्ण व्यापारी वर्गाला मोठा दिलासा मिळेल. तसेच देविदान म्हणाले की, बेंगळुरू व उत्तर भारतात जाण्यासाठीही जालना येथून नवीन रेल्वे सुरू करण्यासाठी संघर्ष समिती प्रयत्न करणार आहे. यावेळी रेल्वे संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष अंकुश राऊत, सदस्य पिपरीये व बालाजी यांचाही व्यापारी महासंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.




# ई-पिक पाहणी करुन घेण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** हंगाम २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानूसार राज्यात नाफेड व एनसीसीएफच्यावतीने पणन महासंघामार्फत राज्यात कडधान्य व तेलबियांची (मुग, उडिद, सोयाबीन व तूर) खरेदी करण्यात येणार आहे. आधारभुत दराने खरेदी करण्यासाठी ई-पिक पाहणी असलेला सातबारा उतारा आवश्यक आहे. तसेच ही खरेदी प्रक्रिया शेतकऱ्यांच्या हितासाठी पारदर्शक, कार्यक्षम व संपुर्णपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे पार पाडली जाणार आहे. केंद्र शासनाच्या आधारभुत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची ई-पिक पाहणी शासनाने दिलेल्या कालावधीत पुर्ण करावी, असे आवाहन पणन महासंघाकडून प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.